


मुंबई : शुक्रवारी सकाळी वैतरणा-१ हे टीबीएम २० महिन्यांनंतर मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानकाबाहेर पडले. मेट्रो-३ मार्गिकेवरील मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानकावरून मुंबई सेंट्रल डेपो, मुंबई सेंट्रल उपनगरी आणि मरिन लाईन्सकडे जाणाऱ्यांना सोयीस्कर ठरणार आहे.

# कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३चा १५वा ब्रेक थ्रू

## आझाद मैदान ते मुंबई सेंट्रलपर्यंतचे भुयारीकरण २० महिन्यांत पूर्ण

**मुंबई : प्रतिनिधी**

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या पहिल्या भुयारी मेट्रो मार्गातील आझाद मैदान ते मुंबई सेंट्रल या ३.८१४ किमीचे भुयारीकरण शुक्रवारी पूर्ण झाले. केवळ २० महिन्यांच्या काळात वैतारणा-१ या टनेल बोअरिंग मशीनने हा महत्त्वपूर्ण पल्ला गाठला. यामुळे डाउनलाईन बोगदा पूर्ण करणारी मेट्रो-३ प्रकल्पातील वैतारणा ही पहिली टीबीएम मशीन ठरली. जमिनीच्या २० मीटर खाली भूगर्भात बेसॉल्ट आणि ब्रेसिया या कठीण दगडातून मार्गक्रमण करीत यशस्वीरीत्या हे काम पूर्ण करण्यात आले. याकरिता २७२० सेगमेंट रिंगचा वापर करण्यात आला.

मेट्रो-३ च्या मार्गातील हा १५ वा ब्रेक थ्रू आहे. अतिशय वेगात आणि दिलेल्या वेळेत मेट्रो-३ या भुयारी मेट्रो मार्गाचे काम सुरू आहे. एचसीसी-मॉस्मेट्रोस्ट्रॉय समूह द्वारे पॅकेज-२ अंतर्गत वैतरणा टीबीएम काम करीत आहे. या भुयारीकरणादरम्यान मेट्रो-३ला अनेक आव्हानांचा सामना करावा लागला. विशेष म्हणजे हे काम फत्ते करत असताना मार्गात १४ उंच इमारती, २८ ऐतिहासिक वारसा वास्तू आणि अतिशय जुन्या इमारतींचा समावेश होता. यापैकी एकाही वास्तूला कसल्याच प्रकारची हानी न पोहोचवता हे दिव्य मेट्रो-३ने पार पाडले.

आतापर्यंत १७ टनेल बोअरिंग मशीनचा वापर करून ३१ किमी भुयारीकरण पूर्ण करण्यात आले आहे. भुयारीकरणाचे काम अतिशय आव्हानात्मक होते. पॅकेज-२चे काम आम्ही दिलेल्या वेळेत पूर्ण केल्याने आमचा आत्मविश्वास दुणावला आहे.
**अश्विनी भिडे**, व्यवस्थापकीय संचालक मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन